# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

**UGC CARE LISTED JOURNAL**

**December 2020**

**Special Issue-Volume-IV**

**On**

## *Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Manoj S. Kamat**
Professor & Principal
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Co-Editor**
**Dr. F. M. Nadaf**
Vice Principal & Professor of Geography
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| **Prof. Camena Guneratne** (Sri Lanka) | | **Dr. RiaAerts** (Australia) |
| **Dr. Mohamed Izhar Hasan** (Rohtak) | **Prof. S. I. Biradar** (Dharwad) | **Dr. Bindhy Wasini Pandey** (New Delhi) |
| **Dr. Biswajit Roy Chowdhury** (Kolkata) | **Dr. Shyam Khinchi** (Ganganagar) | **Dr. Keya Das Ghosh** (Kolkata) |
| **Dr. Suryawanshi M V** (Aurangabad) | **Dr. C. P. Hiremath** (Goa) | **Dr. Sucheta Naik** (Goa) |
| **Shri. Vividh Pawaskar** (Goa) | **Dr. Pramada Gauns Desai** (Goa) | **Dr. Monika Kannan** (Ajmer) |
| **Dr. Arvind Haldankar** (Goa) | **Dr. L. T. Nayak** (Dharwad) | **Dr. Rupa Chari** (Goa) |

**Published by-** Dr. Manoj S. Kamat, Professor & Principal.DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**Price :Rs.1000**

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | A Case Study on Impact of Tourism in North Goa<br>**Vibha Pai Angle, Manoj S. Kamat** | 1-4 |
| 2 | A Study on the Development Trajectories of Two Marginalized Communities in Raigad District, Maharashtra:The Katkaris and the Thakars<br>**Sapna Rokade, Roshna Gawas** | 5-7 |
| 3 | Role of Librarian's in User Education to Information Literacy<br>**Pathan Asad Ahemad** | 8-9 |
| 4 | Milk Cooperative Societies-Some Issues of Sustenance A Case Study of Canacona Goa<br>**Dr. C. P. Hiremath** | 10-14 |
| 5 | A Key Study of Aids Diseases in Satara District<br>**Prof. S. P. Patil, Dr. C. U. Mane** | 15-17 |
| 6 | Assessment Of Groundwater Quality For Drinking: A Case Study From Ilkalhalla Sub-Basin, Bagalkot, And Koppal Districts, Karnataka, India.<br>**Shilpa P. Muragod, Dr A. Sreenivasa** | 18-21 |
| 7 | Gender Budgeting for Gender Equality: A Study of Trends and Patterns in India<br>**Ms. Parvati Kalamadi and Dr. S. T. Bagalkoti** | 22-25 |
| 8 | A Study On Buyer Behaviour Towards Organic Food Products (With Special Reference to Coimbatore City)<br>**Dr.M.Nirmala1 Ms.Vidhyavarsini.R.K2** | 26-27 |
| 9 | Crop Insurance (RWBCIS) for Adaptation to Climate Change in India<br>**Ms. Shanta Mathapati1 Prof. Nayanatara Nayak2** | 28-31 |
| 10 | Effects of Covid-19 on Human Health: Current Status and Reality<br>**Dr. Chandrasekhar Gitte** | 32-34 |
| 11 | Wellness Tourism – An Introductory Analysis<br>**Dr. Sajoy P.B.** | 35-38 |
| 12 | An overview of the alternative tourism potentials of Canacona, Goa–India<br>**Merel S. Dsilva F.M. Nadaf** | 39-42 |
| 13 | Corollary of Human Capital investment on Living Standard<br>**Budihal Nikshep Basavaraj, Dr. N. S. Mugadur** | 43-46 |
| 14 | To Study Service Quality, Customer Satisfaction & Loyalty Of Hospital Industry<br>**Anil Bodko Gaonkar** | 47-50 |
| 15 | Representation of Two Female Generations in the Novel 2 States by Chetan Bhagat<br>**Mr. Sourav Dey** | 51-52 |
| 16 | Economic Valuation of Water Resources Pollution in Karnataka: A Study<br>**Thipperudrappa.E, Dr. Dhananjaya. K. B** | 53-56 |
| 17 | The Growing Problems of Gutkha and Kharra Consumption Among The Working Women: A Sociological Study<br>**Dr. Maroti V. Kolhe, Dr.Kavita Mate** | 57-59 |
| 18 | Covid-19 Lockdown in India: Impacts on The Economy and Key Sectors<br>**Dr. Subba Rayudu Thunga, Mrs. Lavanya P B** | 60-63 |
| 19 | Ecocriticism and Environmental Issues in India<br>**Dr. Nidhi Mishra** | 64-67 |
| 20 | Protection of the Environment along the NH-6<br>**Arvind R. Kale & Dr. Mujahid F. Husain** | 68-70 |
| 21 | The Inter-Generational Tránsition of Educational Attainment of Scheduled Castes in Ahmednagar District (Maharashtra, India)<br>**Mr. Medhe Ravindra Sampat** | 71-75 |
| 22 | Gender Inequality Among Minority Peoples of Batadrava, Nagaon: Factors and Remedies<br>**Mrs. Siva Mahanta** | 76-80 |
| **23** | Changing Coastline Of North Goa From 1990 To 2019<br>**Shraddha Morajkar, Siddhi Gaonkar & Dr. Pravina Kerkar** | 81-86 |

| | | |
|---|---|---|
| 24 | Analysis of Welfare Measure Schemes of Girl Children in Karnataka.<br>**Raviraj. H. Nagaral, Dr. Subashchandra. Natikar** | 87-88 |
| 25 | Analysis of National Health Policies in India<br>**Praveenkumar Sansuddi** | 89-90 |
| 26 | Physical Activity Profile Of Selected Population During Covid 19 Pandemic Outbreak: An Online And Cross Sectional Survey<br>**Prof. Jils Varghese** | 91-93 |
| 27 | A Geographical Study of Female Migrant Domestic Workers in Margao-Goa<br>**Vijaya Nemikal, Dr. Prabir Kumar Rath** | 94-97 |
| 28 | Globalization and Its Impact on Environment in India<br>**Ms. Priyanka K and S.T. Bagalkoti** | 98-102 |
| 29 | Educational Facilities In Karad Taluka Dist Satara (MH).<br>**Shri. S. J. Sakat, Prof. Dr. S. B. Zodage** | 103-107 |
| 30 | Agriculture Distress due to Climate Change: A Special Reference to Karnataka<br>**Ramesh S. Kampli & S.T. Bagalkoti** | 108-111 |
| 31 | Trends of Urban population in Beed District- A Geographical Analysis<br>**Dr. S. B. Ashture, Dr. V. C. Dande** | 112-114 |
| 32 | CRZ Regulations, Environmental Protection And Its Impact On Tourism Of Goa<br>**Ms. Lisha A. Fernandes, Dr. Pravina Kerkar & Ms. Siddhi Gaonkar** | 115-119 |
| 33 | COVID 19 and Bioinformatics: Mini Review<br>**Nisha V. Kevat, Anup S. Deshpande, Nissar Reshi** | 120-122 |
| 34 | Sectoral Impact on IPO Underpricing: An Empirical Study of the Indian Markets.<br>**Kedar Mukund Phadke, Dr Manoj S Kamat** | 123-125 |
| 35 | Impact of COVID-19 on Indian Tourism industry<br>**Dr. Dilip Akaram Gade** | 126-128 |
| 36 | Body Mass Index Changes due to Covid 19 Lockdown related inactivity, and its implication on Health<br>**Mr. Savio Agnelo Leitao** | 129-131 |
| 37 | Agro Tourism: For Sustainable Agricultural Development in CanaconaTaluka.<br>**Dr. Sucheta Y. Naik, Ms.Anisha Sawant Dessai** | 132-136 |
| 38 | Environmental Migrants and Humanitarian Crisis: A Study of Afghan and Tibetan Refugees in India<br>**Dr Badruddin** | 137-140 |
| 39 | Analysis of Relationship between Financial Variables of Indian Banking Sector<br>**Mrs.ReshmaPrabhuVerlekar, Dr. Manoj S. Kamat** | 141-145 |
| 40 | Climatic Disasters and Displacement of People in India<br>**Anand Velip** | 146-148 |
| 41 | Prospects of Commercial Horticulture in North Goa Prior to 2011– A Geographical perspective<br>**Dr. Dadapir. M. Jakati, Dr. B K Haravi** | 149-154 |
| 42 | Evolution of Panaji City: A Geographical Study<br>**Dr. B K Haravi, Dr. Dadapir. M. Jakati** | 155-159 |
| 43 | महिला सबलीकरणात माध्यमांची भूमिका<br>**स्नेहा साहेबराव राठोड डॉ.सुंदर राजदीप** | 160-162 |
| 44 | लोकशाहिर अण्णाभाऊंची वगनाटये : एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. धनंजय होनमाने** | 163-165 |
| 45 | उस्मानाबाद जिल्हयातील सोयाबीन पीक़ केंद्रीकरण : एक भौगोलिक अभ्यास (इ.स. १९९१ ते २०११)<br>**प्रा. डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयॉं** | 166-168 |
| 46 | कोव्हिड-१९ चा पर्यावरणावर झालेला परिणाम<br>**डॉ. सुनिता पांडुरंग सूर्यवंशी** | 169-170 |
| 47 | शाश्वत विकासासाठी जीवन कौशल्ये शिक्षण<br>**डॉ. सोनुने एस. एस.** | 171-173 |

| | | |
|---|---|---|
| 48 | स्वातंत्र्ययुद्ध आणिसोलापुरातील कामगार चळवळ<br>प्रा. डॉ. किशोर जोगदंड | 174-177 |
| 49 | शिक्षा क्षेत्र में सूचना और संचार प्राद्योगिकी का योगदान, का अध्ययण<br>डॉ. सुर्यकांत पवार | 178-180 |
| 50 | पर्यावरण प्रदुषण समस्या : एक अभ्यास<br>कांबळे जे. आर., प्रा. डॉ. पिसाळ एच. जी. | 181-182 |

'Akshar Wangmay' UGC Care Listed & Peer Reviewed International Research Journal, ISSN: 2229-4929, December 2020
Special Issue Volume-IV "Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development"

# शाश्वत विकासासाठी जीवन कौशल्ये शिक्षण

डॉ. सोनुने एस. एस.
सहा. प्रा. शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक-४२२२२२

**सारांश**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात प्रत्येक व्यक्ती सुखी ,समाधानी व यशस्वी जीवनाचा शोध घेत असतांना आपणास दिसुन येते. त्यासाठी अपार कष्टातून व्यक्ती जिवनात यशाचे संपादन करतेतरी देखील ती समाधनी व सुखी असलेली आपणास दिसत नाही. कारण व्यक्तीला जीवनात समाधानी व सुखी व्हायचे असेल, तर उत्तम आरोग्य लाभणे गरजेचे असते.आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक आरोग्याच नव्हे तर त्यात मानसिक आरोग्याचाही समावेश होतो.व्यक्तीच्या शारिरीक व्याधींची , दुखण्याखुपण्याची अनेक कारणे मानसिक लपलेली आहे,हे मानसशास्त्रज्ञ व वैद्यकिय तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे अनेक शारिरीक आजारावर अनेक मानसिक उपचार पध्दती वापरल्या जात आहे. वर्तमान परिस्थितीत चांगले मानसिक आरोग्यां जपण्यासाठी आज प्रत्येक व्यक्ती प्रयत्नशील आहे.चांगले मानसिक आरोग्य हे चांगल्या समायोजनाचे प्रतिक मानले जाते.चांगले समायोजन होण्यासाठी व्यक्तीला विविध गोष्टी व कौशल्यांच्या आधारे स्व व परिस्थिती यात संवाद साधावा लागतो. आज व्यक्ती स्व विकासासाठी प्रत्येक क्षेत्रात प्रयत्नशिल असल्याने त्यातुन निर्माण होणा-या स्पर्धेत यशस्वी व अपयशी होत आहे. काही प्रसंगामध्ये येणारे नैराश्य व ताण - तणाव यातुन ब-याच व्यक्तीं जीवनाचे इतिवृत संपविण्याकडे जात आहे. त्यात केवळ कष्टकरीच नव्हे तर नोकरदार व उच्च विद्याविभूषित , बेरोजगार नव्हे तर उच्च पदावर काम करणा-या व्यक्तींचा देखील समावेश आपणाला दिसुन येतो.ब-याच व्यक्ती ह्या न्युनगंड, चिडखोरपणा , एकटेपणा, गुन्हेगारी प्रवृत्ती ,भावनिक कल्लोळ, कौंटुबिंक ताणतणाव व वैचारीक द्विध्दावस्था ह्यांनी ग्रासलेल्या असतात. कारण त्यांना नैराग्य ,ताण-तणाव व अपयशाला सामोरे जावे हे लक्षात येत नाही.तेंव्हा असा प्रश्न पडतो की,शिक्षणाचा नेमका काय फायदा झाला? शिक्षण म्हणजे चांगल्या जीवनाची तयारी असे आपण म्हणत असतांना असे का घडावे ? या शिवाय अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यातुन शोध सुरू होतो ,जीवन शिक्षणातून शाश्वत विकासाचा.

**प्रस्तावना-**

शिक्षण हे मानवी विकासाचे साधन आहे ,असे आपण सर्व जण म्हणतो. त्यामुळेच आज सर्वच स्तरातील व्यक्ती आपल्या पाल्याला चांगले शिक्षण ,चांगल्या शैक्षणिक संस्थांमध्ये देण्यासाठी प्रयत्नशील असलेले आपणास दिसुन येतात. शिक्षणातुन आपला पाल्य चांगला यशस्वी नागरीक व्हावा असी सर्वच पालकांना वाटते.चांगले शिक्षण मिळून देखील आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धात्मक युगात उच्च शिक्षित झालेल्या व्यक्तींना आपण चांगले सुखीसमाधानी व यशस्वी जीवन जगत आहोत असे वाटत नाही. कारण व्यक्तीला जीवनात समाधानी व सुखी व्हायचे असेल, तर उत्तम आरोग्य लाभणे गरजेचे असते.आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक आरोग्याच नव्हे तर त्यात मानसिक आरोग्याचाही समावेश होतो.व्यक्तीच्या शारिरीक व्याधींची , दुखण्याखुपण्याची अनेक कारणे मानसिक लपलेली आहे,हे मानसशास्त्रज्ञ व वैद्यकिय तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे अनेक शारिरीक आजारावर अनेक मानसिक उपचार पध्दती वापरल्या जात आहे. वर्तमान परिस्थितीत चांगले मानसिक आरोग्यां जपण्यासाठी आज प्रत्येक व्यक्ती प्रयत्नशील आहे

चांगले मानसिक आरोग्य हे चांगल्या समायोजनाचे प्रतिक मानले जाते. चांगले समायोजन होण्यासाठी व्यक्तीला विविध गोष्टी व कौशल्यांच्या आधारे स्व व परिस्थिती यात संवाद साधावा लागतो. आज व्यक्ती 'स्व'विकासासाठी प्रत्येक क्षेत्रात प्रयत्नशिल असल्याने त्यातुन निर्माण होणा-या स्पर्धेत यशस्वी व अपयशी होत आहे. काही प्रसंगामध्ये येणारे नैराश्य व ताण - तणाव यातुन ब-याच व्यक्तींचा कल जीवनाचे इतिवृत संपविण्याकडे जात आहे. त्यात केवळ कष्टकरीच नव्हे तर नोकरदार व उच्च विद्याविभूषित , बेरोजगार नव्हे तर उच्च पदावर काम करणा-या व्यक्तींचा देखील समावेश आपणाला दिसुन येतो. ब-याच व्यक्ती ह्या न्युनगंड, चिडखोरपणा , एकटेपणा, गुन्हेगारी प्रवृत्ती ,भावनिक कल्लोळ, कौंटुबिंक ताणतणाव व वैचारीक द्विध्दावस्था ह्यांनी ग्रासलेल्या असतात. कारण त्यांना नैराग्य ,ताण-तणाव व अपयशाला सामोरे जावे हे लक्षात येत नाही. तेंव्हा असा प्रश्न पडतो की,शिक्षणाचा नेमका काय फायदा झाला? शिक्षण म्हणजे चांगल्या जीवनाची तयारी असे आपण म्हणत असतांना, असे का घडावे ? किंवा शिक्षणातुन त्या व्यक्तीच्या जीवनाच्या झालेल्या विकासाचा? या शिवाय अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यातुन शोध सुरू होतो ,व्यक्तीच्या शाश्वत विकासासाठी जीवन शिक्षणाचा.

**१) जीवन कौशल्य शिक्षण संकल्पना व अर्थ -**

जीवन कौशल्याचे शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या स्वत:च्या मानसिक व शारिरीक सर्वोत्कृष्ट क्षमतांचा वापर करून त्याच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे होय. जागतिक आरोग्य संघटनेच्या मतानुसार - जीवन कौशल्याचे शिक्षण म्हणजे "मानसिक क्षमता व कौशल्य विकासासाठी योग्य सांस्कृतिक व वैकासिक मार्गाच्या अवलंबनातून सराव व प्रेरणा निर्मिती साधणे याचबरोबर आरोग्यविषयक व सामाजिक समस्यासंबंधी दक्षता घेऊन मानवी हक्काची करत वैयक्तीक विकासाबरोबरच सामाजिक विकास साधणे होय" थोडक्यात जीवन कौशल्याचे शिक्षण म्हणजे ' सामाजिक मार्गाने जीवन सुखी,समाधानी ,यशस्वी होण्यासाठी दिले जाणारे शिक्षण होय. राष्टसंत तुकडोजी महाराज यांनी देखील यशस्वी जीवनासाठी जीवनाला उपयोगी पडणाऱ्या विविध कौशल्या चा पुरस्कार केला आहे.तसेच भावनिक बुध्दीमत्ता विषयक घटकांम्ध्ये देखील काही जीवन विषयक कौशल्ये आपणास दिसून येतात.

**२) जीवन कौशल्य शिक्षणातील मूलभत कौशल्ये-**

जीवन कौशल्य शिक्षणातील काही मूलभूत जीवन कौशल्ये आपणाला खालील प्रमाणे सांगता येतात.

**१) 'स्व'जाणीव -**

स्व जाणीव म्हणजे स्वत: च्या क्षमता, मर्यादा ,भाव-भावना,अभिरूची,बलस्थाने,कमतरता,व स्वत:च्या शारिरीक ,मानसिक स्थितीची जाणीव असणे होय.या कौशल्यामुळे व्यक्तीला स्वत :ची आवड निवड,भावना,वृती,कार्यक्षमता,यांच्याबद्दल स्पष्टपणे विचार करता येतो व स्व क्षमतांचे मूल्यमापन करता येते.त्यानुसार आपली कार्य व भूमिका,जबाबदारी योग्य रितीने पार पाडता येतात..

**२) सहसंवेदना –**

सहसंवेदना म्हणजे सहानुभूती नव्हे तर दुस-या व्यक्तीला त्याच्या भूमिकेत जावून जाणून घेण्याची प्रक्रिया आहे.त्यानुसार दुस-याचे दु:ख,भावना,त्याच्या भूमिकेत जावून जाणून घेण्याचा प्रयत्न करते.त्यातुन दुस-या व्यक्तीला त्यावर मात करण्यासाठी वा मदत करण्यासाठी मदत करते. सहानुभुतीमुळे एखाद्या व्यक्तीला दु:ख होऊ शकते,पण सहसंवेदनामुळे व्यक्तीत आत्मविश्वास व प्रेरणा निर्माण करता येते.

**३) समस्या निराकरण -**

जीवनात येणारे प्रश्न म्हणजे समस्या होय.समस्या लहान असो वा मोठी त्यातुन बाहेर पडण्यासाठी आपल्याला मार्ग शोधण्याची आवश्यकता असते.गोंधळून टाकणा-या अवघड परिस्थितीतुन मार्ग काढण्याच्या प्रक्रियेला समस्या निराकरण असे म्हणतात.

**४) निर्णय क्षमता -**

एखाद्या समस्ये संदर्भात माहितीचे विश्लेषण, चिकित्सक पृथ्करण,आणि समस्या सोडविण्यासाठी योग्य मार्गाची निवड करणे,याला निर्णय क्षमता असे म्हणतात.किंवा सारासार योग्य अयोग्यता विचार करून केलेली कृती होय .व्यक्तीची अशा प्रकारची विचार करण्याची प्रक्रिया व योग्य पर्याय निवडण्यासंबधी निर्णय घेण्याची क्षमता वा कौशल्याचा यात समावेश होतो.निर्णय क्षमता ह्या कौशल्ये विकासात कुणीही बाहेरून निर्णय लादणे व ते स्विकारणे अपेक्षित नाही.तर व्यक्तीने स्वत: च्या क्षमतेनुसार विविध प्रसंगात ते निर्णय घेतले पाहिजे.

**५) परिणामकारक संप्रेषण-**

एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीला पाठविलेला संदेश व त्या संदेशाचा दुस-या व्यक्तीला समजलेला योग्य अर्थ म्हणजे संप्रेक्षण होय.यालाच आपण संवाद असे म्हणतो.संवाद ही एक गुतांगुंतीची आणि इतरातील आंतरसंबंधीत असलेली प्रक्रिया आहेमाहितीचे योग्य व अचूक संकलन,अन्वयन,संदेशात रूपांतरणसांकेतीकरण, दृक किंवा इतर मार्गाच्या माध्यमाची अनुषंगाने केलेली निवड हे सर्व ह्या कौशल्यात अपेक्षित आहे.

**६) व्यक्ती- व्यक्तीमधील परस्परसंबंध-**

मानव हा समाजशील प्राणी असल्याने तो,एकटा राहू शकत नाही.त्याला समाजात राहतांना विविध गरजांच्या पूर्ततेसाठी एकमेकांशी आंतरक्रिया कराव्या लागतात. शिवाय आपले सुख –दुख: वाटण्यासाठी , तसेच स्व- विकास साधण्यासाठी परस्पर संबंध निर्माण करावे लागतात.त्यामुळे एकमेकांचा आदर ,ऐकमेकांबद्दल प्रेम, आपुलकी,प्रामाणिकपणा,स्नेहबंध असणे गरजे ठरते.

**७) सृजनशिल विचार -**

सृजनशील विचार म्हणजे असे चिंतन की ज्या विचारप्रक्रियेतुन काही तरी नवीन उपयुक्त व असाधारण अशी निर्मिती होते. नावीन्यपूर्णता व मौलिकता ,असाधारणत् इ.बाबी त्यात दिसून येतात.समस्येविषयक संवेदनशिलता, प्रवाहीपणा लवचिकता, मौलिकता, पृथ्थकरण व संयोजन, पुनर्निरूपण,उत्पादकता इ.या बाबी सृजनशील विचाराचे घटक मानल्या जातात.सृजनशिलतेमुळे जीवनात गतिमानता येते.

**८) चिकित्सक विचार –**

एखाद्या विषयाची माहिती जशीची तशी न स्विकारता, ती तर्कशुध्दतेच्या साह्याने वा वैज्ञानिक पध्दतीनुसार सारासार विचार करून निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजे चिकित्सक विचार होय. चिकित्सक विचार प्रक्रियेमुळे व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होते. तसेच ती आत्मनिर्भरता येण्यास त्यामुळे मदत होते.

**९) भावनांचे समायोजन –**

जीवन जगत भावना हा शब्द आपण अनेकदा वापरतो.संवेदनशीलता, कोणताही क्षोम,मानसिक स्थैर्यभंग, सहनशिलता, अथवा मनाची प्रक्षुब्धावस्था यांच्या शी संबंधीत भावना हा शब्द आपणाला दिसतो.भावना ह्या सकारात्मक असो किंवा नकारात्मक असो,त्या विशिष्ठ मर्यादे पलिकडे गेल्या तर त्या अपायकारक ठरतात.म्हणून भावनांवर नियंत्रण करता येणे आवश्यक ठरते.

**१०) ताणतणावांचे व्यवस्थापन -**

शारिरीक श्रम,संकटकालीन परिस्थिती किंवा अपयश ,चिंता ,किंवा आव्हाने,काल्पनिक भिती यातुन आपल्या मनात व शरीरात जे बदल घडून येतात.त्यातुन जे एक प्रकारचे दडपण निर्माण होते त्यास ताण-तणाव असे म्हणतात. अपेक्षित बाबी प्रत्यक्षात न आल्यास व्यक्ती ताण-तणावाने ग्रस्त बनतात.त्याचे योग्य व्यवस्थापन न केल्यास ती स्वत : स्व हरवून बसते. चिंता,चिडचिड, मनंस्ताप,आजारपण, नैराश्य ,अपयश ,ताण-तणाव, मानसिक विकृती ,आदीनी ग्रासली जाते.

**३) जीवन कौशल्य शिक्षणात अध्यापकाची भूमिका-**

अध्यापकाने अध्ययनार्थीत स्वजाणीव निर्माण करण्यासाठी त्याची बलस्थाने व मर्यादा यांची त्यांना विविध उपक्रमाच्या माध्यमातुन जाणीव करून द्यावी.सहशालेय उपक्रम व विविध कार्यक्रमातुन आंतरीक संबंधाचा विकास कसा साधावा हे लक्षात आणून द्यावे.कला,क्रिडा,साहित्या इत्यादीच्या माध्यमातुन त्यांच्यीतील सृजनशिल विचार विकासाला चालना द्यावीविविध प्रसंग ,घटना,माहिती इत्यादी त्याच्या समोर मांडून त्यांना चिकित्सक विचार करण्यासाठी प्रेरणा द्यावीखेळ व स्पर्धा इ.च्या माध्यातुन भावनांवर नियंत्रण ठेवण्यास व योग्य मार्गाने व्यक्त करण्यास शिकवावे.योगा- सुर्यनमस्कार, खेळ व इतर माध्यमातुन ताण-तणावांचे समायोजन व व्यवस्थापन कसे होते हे लक्षात आणून द्यावे.विविध समस्या त्याच्या समोर मांडून त्यावर मार्ग काढण्यास लावावेशिवाय कठीण प्रसंगात निर्णय घेण्याच्या क्षमता विकासासाठी त्यांना वर्गातील प्रसंगात प्रेरित करावेवादविवाद,वकृत्व आदी स्पर्धेतुन त्यातील परिणामकारक संप्रेषण क्षमतांचा विकास घडवून आणावा.

**थोडक्यात निष्कर्ष-.**

१) जीवन कौशल्य शिक्षणातून अध्ययनार्थीला स्वत: मधील क्षमतांची माहीती होते.

२) जीवन कौशल्य शिक्षणातून अध्ययनार्थीचा भावनिक,वैचारीक ,सामाजिक विकास होतो.

३) जीवन कौशल्य शिक्षणातून ताण-तणाव विरहीत जीवन जगण्यासाठी मदत होते.

४) जीवन कौशल्य शिक्षणातून परिसरातील विविध घटकांशी किंवा नवीन परिस्थितीशी अध्ययनार्थीला समायोजन साधण्याचे कौशल्ये प्राप्त होते.

५) जीवन कौशल्य शिक्षणातून सुखी,समाधानी ,आनंदी व यशस्वी जीवन जगण्यासाठी दिशा व प्रेरणा मिळते.

६) जीवन कौशल्य शिक्षणातून व्यक्ती-व्यक्तीमधील आंतरीक संबंध निकोप राहण्यासाठी व वृध्दींगत होण्यासाठी .

७) जीवन कौशल्य शिक्षणातून विषम समायोजन टाळून निकोप मानसिक आरोग्य ठेवण्यासाठी.

८) यशस्वी समाजजीवनासाठी जीवन कौशल्य शिक्षण महत्वाचे ठरते.

**समारोप**

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जीवन कौशल्य शिक्षणातून व्यक्तीला मनशांती,आरोग्य,यशस्वीता ,नावलौकिक,प्राप्त होवून त्याच्या व्यक्तीमत्वाचा शाश्वत विकास होतो.त्यामुळेच पुस्तकी शिक्षणाबरोबरच जीवन कौशल्ये शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी महत्वाचे व गरजेचे ठरते.

**संदर्भ सूची:**

१) रवि जाधव, गौतम गायकवाड,(२०१५),शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह,कैलास पब्लीकेशन्स औरंगाबाद.

२) करंदीकर सुरेश,मंगरूळकर मिना, (२००२),उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण,फडके प्रकाशन,कोल्हापूर.

३) हिरा अहेर, (१९९५), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक,विद्या प्रकाशन नागपूर.

४) अरविंद दुनाखे, (२००७) ,उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक,नित्य नूतन प्रकाशन

५) विश्वंभर कुळकर्णी,.ना.ग.पवार.,म.बा.कुंडले,.रा.गुणे. शिक्षणाचे तात्विक,सामाजिक व सांस्कृतिक यथार्थदर्शन भाग -1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२२२२

६) विश्वंभर कुळकर्णी,.मधुकर सोनार .प्रा.श्रीरंग गुणे,प्रा.प्रतिभा वीरकर .शिक्षणाचे तात्विक,सामाजिक व सांस्कृतिक यथार्थदर्शन भाग-2 - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२२२२

७) Daniel Goleman, (2013)Working With Emotional Intelligence. Bloomsbury,Publishing India Pvt Ltd.New delhi-110070

८) Daniel Goleman, (2013), Emotional Intelligence. Bloomsbury, Publishing India Pvt Ltd.New delhi-110070